म. ग्रं. सं. ठाणे.
विषय ........ काव्य
सं. क्र. २६०७



# पंखपल्लवी

कृ. ब. निकुम्ब

संदर्भ
काव्य
२६०८
२६७९

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागले.

( कृ. मा. पहा )
१००००–११–८९

पंखपल्लवी

पारख प्रकाशन, बेळगाव.

# पंखपल्लवी

कृष्ण बलवन्त निकुम्ब

| | | |
|---|---|---|
| प्रथमावृत्ती | : | दीपावली, शके एकोणीसशे अकरा.<br>सन तीस आक्टोबर, एकोणीसशे एकोणनव्वद |
| सर्वाधिकार | : | कृ ब. निकुम्ब<br>'गीतांजलि', काळी आंबराई, बेळगाव-१. |
| प्रकाशिका | : | आशा वि. जवळकर<br>पारख प्रकाशन,<br>२१, चर्चस्ट्रीट, कॅम्प बेळगाव. |
| मुद्रक | : | सय्यद ए. कडोलकर<br>ब्ल्यू प्रिंटर्स, दरबारगल्ली, बेळगाव. |
| मुखपृष्ठ | : | वासंती मुझुमदार<br>६९, विष्णुप्रसाद रानडे रोड,<br>शिवाजीपार्क, दादर मुंबई-२८ |
| मूल्य | : | रुपये पस्तीस फक्त |

सौ. शकुन्तलेस–

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

कराच्या खुणांनी बोलणारी ती करपल्लवी,
नेत्रांच्या संकेतांनी सांगणारी ती नेत्रपल्लवी.
त्याच चालीवरची ही 'पंखपल्लवी' : पंखांच्या
खुणांची भाषा. (पान : २५)

'अभ्र' या काव्यसंग्रहानंतरच्या एका तपावरच्या
निवडक कविता या 'पंखपल्लवी'त समाविष्ट
केल्या आहेत. ही निवड करताना
ज्येष्ठ कवयित्री इंदिराबाई संत
यांची चोखंदळ, आस्वादक दृष्टी साहाय्यकारी
झाली, हा या संग्रहाचा गौरवार्ह विशेष !

## पानसाखळी


कळ १३
जन्मजात हर्षाची – १४
अरून-फिरून १५
शब्द १६
ऋचा १७
थोडे तुझे – १८
गाथा संपलेली नाही १९
गंध कळीत – २०
क्षणभर स्तब्ध – २१
तळ २२
समांतर २३
यातायात २४
पंखपल्लवी २५
आभाळी दिसे न – २६
घन आनंदाचा २७
क्षणी एका २८
आश्वासन २९
उत्तररात्रीच्या – ३०
पाठीवरी उन्हाचे – ३१
येता सरीवर सरी ३२
काहीच न घडल्यासारखो ३३
जेव्हा जलब्रह्म – ३४
सवलत ३५
अर्थ ३६
तू ओथंबून ३७
माझ्यासंबंधीच ३८
उमज ३९

घोळवावा ओठांआड ४०
वाट बुजलेली ४१
अनिद्र ४२
कातर ४३
पानावरतीं ४४
शब्द शहाणे असतात ४५
अरक्त ४६
केशिरो ४७
निर्दय एकाग्रतेने ४८
ऐन माध्यान्ही ४९
जगावेगळचा ५०
पुष्पहारासारखा ५१
साक्ष ५२
वडाची गोष्ट ५३
मुक्त बोलली-बोलली ५४
भान ५५
एखादा ५६
भिंती ५७
मुक्त ५९
फासे ६०
खोड ६१
चिरेबंदी ६२
केशवसुतास — ६३
पाने ६४
बोट ६५
आज्ञा ६६
उरी फुटताही ६७
गुढी ६९
अंधार कोरिला ७०
आपल्या वाटांनी ७१

भैरवी : एक रागिणी ७२
तिसरेच ७३
आधीच ७४
पेरले न काही ७५
पाहतो मी – ७६
जिवलग – ७७
खुणेच्या शब्दांचे अर्थ ७८
अर्धीच ७९
पाखफुटे ८०
ते म्हणतात ८१
जखडलेले ८२
भेट ८३
सूर्यफळ ८४
जाग ८५
सूर्य हा– ८६
तांडा ८७
अकलंकित ८८
कवाड ८९
अनोखे ९०
जित्या जडावाचे लेणे ९१
संदर्भ ९२
असाच केव्हा येऊन जा ९३
सत्त्व ९४
नभ निळेभोर ९५

हे न झाले, ते न आले,
चार चिंता, चार वार्ता...
दिस असा संपून जाई
तो न माझा! मात्र आता -
हा दिवा माझ्या उशाशी
हाति काव्यग्रंथ आहे,
रात्र किति उलटून गेली
ती न आता खंत आहे!

कृ. ब. निकुंब

# पंखपल्लवी



## कळ

मिट्ट काळोख,
घनगर्द पाऊस
प्राण फुंकून सूर धरल्यासारखे
त्याचे लयबद्ध कोसळणे
धमनीधमनीत !

माझ्यातच हरवलेल्या मला
गवसत असते कधी-काळचे काही-बाही,
नाभीतून उमलत येते एक अनोखी कळ
वेलीसारखी

जिच्या कमळाकमळावर असतो
एकेक ब्रह्मदेव !

## जन्मजात हर्षाची –

जन्मजात हर्षाची कवचकुंडले लेऊन आलेले ते दिवस
जेव्हा 'जातो-जातो' म्हणत होते,
तेव्हा मी तुला सांगितले होते :
त्यांना हसत निरोप दे ! आसूभरल्या डोळ्यांनी
उगीच त्यांना खुणवू नकोस :
'निदान कुंडले तरी ठेवून जा !'

आता आणखीही एक तुला सांगायला हवे :
रमतच राहाशील अजूनही जर
त्या कवच-कुंडलांच्या बिलगत्या स्वप्नात
बेभान, तर

या दिवसांच्या तडफडत्या जखमांवर
कधी फिरणारच नाही तुझा सांत्वनाचा हात !

अरून-फिरून

अरून-फिरून पुसू नकोस ! -मला काहीच सांगता येणार नाही,
उदाहरणार्थ :
आभाळ कुठून, कसं सुरू झालं मला खरंच ठाऊक नाही !
आरंभ असलाच तर त्याला अखेरही असेल,
हा सावध विचार माझ्या मनात कधी उगवलाच नाही !
वैशाखातलं आभाळ ओकंबोकं, अस्वस्थ-तेही मला आवडतं
आणि आषाढातलं धुंद, कुंदसुद्धा—
त्याच्या रूपांची प्रत मी कधी ठरवलीच नाही !
त्याचे रंग मी कधी मोजले नाहीत,
तारांचा हिशोब मांडला नाही !
ते माझं आहे हे मला कसं उमजलं, तेही मला कळलं नाही !
मी त्याचा झालो आहे का, त्याचाही शोध मी कधी घेतलेला नाही!
पाहिलंस ना ? मला काही म्हणता काहीच सांगता येत नाही.
तू विचारत होतीस एक आणि मी . . .
जाऊ दे ! समज की, आभाळाबद्दल मी मुळी बोललोच नाही!

## शब्द

शब्द : सांगणारा
शब्द : थांबणारा-अहेतुक, सहेतुकही !
शब्द : प्रपातासारखा अस्खलित, अनावर
शब्द : घनगर्द कुंजासारखा चाहूल न देणारा
आतल्या एकांताची
शब्द : रथयात्रेत बेहोष घोंगावणारा
शब्द : उजळणारा लावताना सांजवात
तुळशीपाशी . . .
नवल एक : शब्दांची वाटणी इतकी विषम कशी
तुझ्या-माझ्यात ?
नवल दोन : तुझे-माझे मौन मात्र एकरूप,
आस्वादक
फुलानेच फुलाचा वास घ्यावा, तसे !

## ऋचा

उजळला दिवा
आडोसा हातांचा
बोटांच्या फटींत
प्रकाशाची ऋचा

अर्ध सांगू येई,
अर्ध राही मूक
कळून कळे ना
उघडे चेटूक !

मात्र पावलांना
लख्ख फुटे वाट
रक्तातून उठे
आरक्ताची लाट !

## थोडे तुझे–

थोडे तुझे,
थोडे माझे
सारे आपुल्या दोघांचे

कुठे शुभ्र,
कुठे अभ्र
रंग अनोखे नभाचे

काही प्राप्त,
काही लुप्त
काही फक्त क्षितिजाचे

नाही खंती –
जे-जे हाती
ते-ते आनंदघनाचे !

## गाथा संपलेली नाही

गाथा संपलेली नाही
पाने सांडली आहेत
शब्द कुंठित परंतू
भाव ओथंबला आत

ओळ उरल्या पानांची
आगेमागे झाली कुठे,
विखुरल्या खुणा काही
दृष्टीआड इथे-तिथे !

थांब, असे रानोमाळ
सैरा धावायचे नाही,
फुटू पाहतसे ऊर
भाव अभंग तरीही !

कळ सोसावीच लागे
सोस जरा-गवसेल
अडलेला शब्द-शब्द,
वाट चुकलेली ओळ !

## गंध कळीत –

गंध कळीत निजला
उगा जागवू नकोस,
मौन अवनम्र, तेथे
शब्द वाजवू नकोस !

पक्वतेच्या क्षणी येई
मुक्त सुगंध मौनास
तेव्हा असावे आपण
आड, तरी आसपास !

## क्षणभर स्तब्ध –

क्षणभर स्तब्ध कुट्ट आकाश रात्रंदिवस कोसळून-गळून
कुण्या फटीमधून सांडले पिवळ्या परागांचे ऊन !

चाचपडताना अंधार–गुहेत कसा अवचित कोन साधला ?
गूढ झरोक्यातून थेट मूर्तीवरच किरण पडला

उभे अद्‌भुत, निर्मळ रूप, लावण्याचे फूल ओठी
मरणाला ओलांडुन गेली क्षणभर माझी कच्ची माती !

थरार अजून तसाच ! –तोच कोसळू लागली झड फिरून
कोसळ बाई, खुशाल कोसळ ! जगात माझ्या पिवळे ऊन !

## तळ

असा बहर दाटला
पान-पान झाले फूल,
डोळां काजळासारखी
शिरे मखमली भूल

एक-एक पेरिले ते
लक्ष-लक्ष आले फळा,
सुखाच्याही शोकापरी
असह्यच होती कळा !

सारी चढती-वाढती
डोळ्यांसमोर वळणे,
तृप्त मनाचे त्यांतून
मागेपुढे जाणे-येणे !

सारे पावलो भरून
संथ हेलावती लाटा
– आत-आत वाटते का
तळ झाला रिता-रिता ?

## समांतर

समांतर कक्षांनी चालायचे आहे ! जखडली आहे पावलांना वाट
समांतर कक्षांनी तुडवायची धूळ, लंघायच्या दऱ्या, वेंघायचे घाट

धनुष्याच्या टोकाने आखलेली रेखा अलिकडे-पलिकडे मोडायची नाही
आसुडाच्या खुणांची दटावणी मागून, नजरेबर पट्टी बांधायची नाही !

मोडून यावे वाट, तर कक्षेतच खिळेल घोटचापर्यंत पाऊल, आहे असा खोडा
चालताना फार तर खेळावा खेळ : तटाबाहेर उडवायचा मनातला घोडा !

सोसवो-न-सोसवोत कळीला वेणा, स्पर्शाची पाकळी जन्मायची नाही
कातळावर पडताना बाहूची उशी शिणलेल्या माथ्याला मिळायची नाही !

हेहि नसे थोडे की, तुझ्या-माझ्या शिरी अजून तरी अभंग एकच आकाश
अन् ओलावता येती न रुखे तुझे ओठ, तेव्हा माझीही क्षणात करपते प्यास !

## यातायात

ऐन भरात मधेंच
शब्द थबकत राही,
वळणांची बाट जशी,
दिसे-दिसेनाशी होई !

वेस उघडून उभा
गाव मुक्कामाचा आत,
बोला-अबोलाची मग
हवीच का यातायात ?

## पंखपल्लवी

मी निवांत असतो, कधी निकडीच्या उद्योगात मग्न,
कधी तर माझी झोप चाळवते अकारणच
ऐन रात्री –
आणि ती पाखरं येतात-एखादंच, जोडीने,
थवासुद्धा !
कधी येतील त्याचा ताळमेळ नसतो !
डोळे भरून पाहावं, तर
रांगोळीचे थेंब रेखावेत-पुसावेत, तशा
भराभर हालचाली करीत,
किरणांचा सोनेरी लपंडाव
उडत्या पंखांवर झेलत,
पापणी लवते-न-लवते तोच
दूर दूर निघूनही जातात !

मागे झिळमिळत राहाते त्यांची पंखपल्लवी
कधी ती उलगडल्यासारखी वाटते, पुष्कळदा
चकवाच असतो गवसल्या–हरवल्याचा,
केव्हा तर वाटही बंद–
एखाद्याच वेळी मात्र अचूक सापडतं ते गूज
उभ्या-आडव्या शब्दांत !

एरव्ही निर्चित,
वाट पाहात . . .

## आभाळी दिसे न –

आभाळी दिसे न जरी आभाळाची खूण
पिच्छ उभारून उभे पर्युत्सुक मन

उजळ निळाई, तरी नाच रिघे पायी
कळ प्रतीक्षेची मुळी सोसवत नाही !

वर तेढे ऊन, आत येई उतटून
भार असह्यच धुंद नर्तनावाचून !

अस्वस्थाचा ताण द्यावा पार झुगारून
मुक्त व्हाया अनावर अर्पणाची धून !

नाच रे, खुशाल, असो-नसो वर्षाकाल
येईलच घुमवीत मेघ आदिताल !

## घन आनंदाचा

घन आनंदाचा
बोळला सावळा
काळीत दाटल्या
सुगंधाच्या कळा

जागला अंकुर
इवलेसे दळ
चार पाकळयांचे
इवलेच फूल !

मन माझे झाले
पिवळी पाकोळी
– कालच्या जगाची
बाट विसरली !

## क्षणी एका

क्षणी एका निखळली
घट्ट लावलेली खीळ
सोसलेले, साठलेले
उफाळले उतावीळ

संयमाचे विष प्याले
शब्द वर्षले रोकडे
कुठे छिन्न-छिन्न जुई,
कुठे कोसळले कडे !

नाही अनुताप आता
नुरे तगमग, पण
उजळले नाही नभ,
नाही फाकलेले ऊन !

## आश्वासन

अशी कासावीस होऊ नकोस –
तुला सांगितलं आहे ना : खिड-खिड रोधून, सावधपणाने
अरिष्ट जेव्हा अकस्मात् रोरावत समोर उभं ठाकतं,
आव्हान झेलणारे आपले हातच कैद करून,
तुझ्या-माझ्या माथ्यावर एकेक अजस्त्र पाऊल रोवून,
तुला-मला दडपू पाहतं, खोल...आणखी खोल...
तेव्हाही माझ्या मनातल्या निबिड पावसात
इंद्रधनुष्य उमटलेलं असतं
उत्तर-दक्षिण क्षितिजांना जोडणारं, अभंग
आणि हातांत हात गुंफून
जोड-पावलं टाकत
आपण त्या कमानीखालून जात असतो पुढे-पुढे...
पूर्वेकडे !

– मुळीच हतबुद्ध होऊ नकोस ! आठवून पाहा:
आपण पार पलीकडे जाईपर्यंत
हे सप्तवर्ण आश्वासन
अद्याप कधीच मावळलेलं नाही !

## उत्तररात्रीच्या –

उत्तररात्रीच्या ऐन निवांतातल्या
उत्कट चांदण्यासारखे
दूरपर्यंत पसरलेल्या
एकाकी रस्त्यावर
थबकून राहिले आहे
हे माझे मन
कधीकाळच्या कुण्या बेभान अवस्थेच्या
आठवात !

– दिशा फाकतील
चांदणे कलणार नाही,
हलणार नाही,
आपण खिरून जात आहोत,
हेही त्याला कळणार नाही !

## पाठीवरी उन्हाचे –

पाठीवरी उन्हाचे आसूड साहिले मी
नित जागवित श्रद्धा : ग्रीष्मास अंत आहे !

काळीवरील नाही विश्वास आटलेला
हा हात कष्टणारा विश्राम ना तयाला

ही नांगरून भूमी ओतून जीव, आता –
ओथंबल्या घना, मी निष्ठा तुझी पहातो !

## येता सरीवर सरी

येता सरीवर सरी
'नको' तरी म्हणू कसे ?
— माझे अंगण-परसू
इवलेसे, इवलेसे !

सरीवर सरी आल्या
वेढा पडला घराला
चार चढून पायऱ्या
लोंढा ओटीवर आला

उभे राहून दारात
'थांब' तरी कसे म्हणू ?
आत रिघाला खुशाल
तोच घरधनी जणू !

मीच होऊन पाहुणी
आसासून वाट पाही—
असे ओसंडून कुणी
म्हणेल का: 'ये ग बाई !'

## काहीच न घडल्यासारखी

काही-काहीच न घडल्यासारखी
सहजपणाची ऐट साधून
लख्ख सकाळच्या निरभ्र प्रसन्नतेने
एखाद्या फुलचिमणीच्या लगबगीत
तू केव्हाची चिवचिवते आहेस, निमित्त शोधत
या-त्या विषयाचं !
तूच करते आहेस पूर्वपक्ष, उत्तरपक्षही !
त्यांतले सूचक तपशील, उघड मिस्किलपण, ते
मान कलती करून सापेक्ष थबकणं –
उगीच,
माझ्या अनिच्छ 'हूं-हूं' कडचं सफाईदार दुर्लक्ष . . .
सारं कसं अलगद सांभाळलेलं !
छान !

पण चाऱ्हीकडून आभाळ भरलेलंच असताना
मला नाटक करता येणार नाही
कोवळ्या उन्हाचं !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

## जेव्हा जलब्रह्म –

जेव्हा जलब्रह्म रोरावत येते, दौडत
दोन्ही तीरे उल्लंघून,
वर्षेला कृतार्थ करीत
दाखवीत संथ लयीचे प्रौढ आभास
डोळे बांधून घेत, हुलकावण्या देत
गतिचक्रात भिरकावल्याच्या,
बघणाऱ्यालाच –
तेव्हा जयघोष करावा, उचंबळून
त्या जिवंत आवेगाचा
शक्य तर त्याच्या गर्जितापेक्षाही
घनगंभीर !

शाप उच्चारू नयेत,
मुरडू नयेत नकटी नाके शक्य असले तरी
बोटे रोखून,
त्याच्या विध्वंसक विपरीतांवर.

आणि दोन्ही पापण्या मिटून
शक्य तर, आठवावे त्याचे शालीन रूप
शीतळ ऋतूतले
अलगद जपत राहाणारे आपल्या शीतळ मायेत
तीरावरचे घाट, भव्य गोपुरे, उंच कळस
आणि
गर्द-गर्द कृष्णसाळ दूधभरल्या दाण्यांची !

## सवलत

आसवांनो, तुमच्या स्वाधीन केले आहे माझे आकाश
एकाच अटीवर
की, तुम्ही कधी गर्जायचे नाही, बरसायचे नाही,
श्वास रोखून वावरायचे आहे, कळ सोसत
ओथंबलेपणाची !

पण तुम्ही भान विसरता,
असावध कोसळता
कधीही, कुठेही, ग्रीष्मातसुद्धा–ग्रीष्मातच
पुष्कळदा !

मला हे चालणार नाही !

तुम्ही अगतिक उचमळता, कधीमधी
परक्या श्वासांचे पहारे पेंगतात तेव्हा,
तेवढी सवलत तुम्हाला पुरेशी आहे ! –

लक्षात ठेवा : तुमच्या स्वाधीन केले आहे
माझे आकाश, एकाच अटीवर –

## अर्थ

कधी अगत्य अथांग,
केव्हा उपेक्षेचा वार
गवसावे, निसटावे
असे त्यात थोडेफार

फुलावे मी गंध परी
मुक्त दरवळू नये,
कोमेजता अखेरचे
दळ मात्र घळू नये

दक्ष, दुर्बोध तू अशी
मी तो अशांत, अस्वस्थ...
एका उद्वेगाच्या क्षणी
लख्ख उजळला अर्थ :

नजरेच्या दोरीवर
चालवावे–तुझा खेळ !
आणि तात्काळ मी लीले,
खाली टेकले पाऊल !

## तू ओथंबून–

तू ओथंबून कशी येत नाहीस केशरी देठाच्या
लक्ष-लक्ष शुभ्र स्वप्नांनी,
उत्फुल्ल आनंदाचा क्षण सामोरा येतो तेव्हा ?
त्याच्या स्वागतासाठी तुझ्याजवळ असतो
एखादा कटाक्ष, एखादं स्मित आणि
उमटलेच तर चार-दोन शब्द !

तुझी संवेदनाच क्षीण तरी कशी म्हणू ?–
तुला उशीरच होतो किंचित्
माझं मिटणारं मन उमगायलाही;
मग मात्र पारा धावू लागतो तुझ्या लगबगीतून,
तुझं दिसणं, पाहणं, काही करणं, न करणं, नुसतं असणं–
साऱ्यातून हळुवार अर्थ झरू लागतात, सहजस्फूर्त,
खोल, सुखद स्पर्श करणारे !

त्या आनंद-क्षणाचा हा सत्कार नसतो–
मला जाणवतं:
तू अधिक हलली आहेस माझ्या अपेक्षाभंगाने !
–आणि पुन: उमलून येतं माझं मन
पाचही पाकळ्यांनी !

## माझ्यासंबंधीच

पुढले दोरच कुणी कापून टाकले
म्हणून पळती पावले उलटवणारे–
फार तर, त्यांना अगतिक म्हणता येईल,
शूर नव्हे !

ज्यांच्याजवळ ते बळ असते
की, ज्यामुळे आपोआप
कापुर होऊन जळते
निर्वाणीच्या वणव्यात मृत्यूचे भय
ते धन्य !

माझ्यासंबंधीच बोलायचे, तर
जेव्हा बुजवलेल्या असतात
परतीच्या वाटा
माझ्या मीच, आपल्या हातांनी
तेव्हाच मी शस्त्र उचलतो

आणि एवढेही मला पुरेसे आहे !

## उमज

मी घेइन तारा म्हणता
आकाशच सन्मुख झाले,
फूल एक घ्यावे म्हटले:
प्राजक्त उभा टपटपला ! –
मी खुडली नाही तारा,
मी फूल उचलले नाही,
परि मलाच माझ्यामधले
उमगले अनोखे काही !

## घोळवावा ओठांआड

घोळवावा ओठांआड
        काळजाचा बोल
भानविसरल्या क्षणी
        सावरावा तोल

काठावरूनीच घ्यावा
        अथांगाचा थांग
दिठीनेच रोमांचून
        यावे अंग-अंग

सुख-दुःख-शिपल्यात
        जपावेत मोती
लेणे त्यांचे लेऊ नये
        कधीच ललाटी

विश्व तुझे-माझे, त्याची
        नीत अवघड
कुण्या उःशापाची का ही
        उजळती कड ?

## वाट बुजलेली

हाच शुष्क नदीकाठ
तीच पलीकडे राई–
वाट बुजलेली, तरी
खुणा पटतात काही :

झरा उकरून प्यालो
पाणी एका ओंजळीने
चित्र डोळ्यांपुढे–परी
चित्त थरारत नाही !

तरुतळी लवंडता
खेळविले कवडसे
स्मरे–बोटांत लालिमा
मात्र उजळत नाही !

माझी प्रश्नांकित मुद्रा,
तुझे संदिग्ध उत्तर
शब्द जागतात फक्त–
ऊर ओसंडत नाही !

दिस मावळून झाला
आत-बाहेर काळोख,
चंद्र उगवे न–त्याची
आता खेद-खंत नाही !

## अनिद्र

संपल्या आहेत ! –
बाटलीतून भसाभस उसळणाऱ्या राक्षसासारखे
कभिन्न सावल्यांचे अवजड थर
सतत छातीवर रचत राहणाऱ्या
त्या गुदमरणाऱ्या अनिद्र रात्री
संपल्या आहेत !

मी पुनः बाटलीत भरला आहे तो राक्षस
प्राणांची होड लावून,
बाटली भिरकावली आहे सातासमुद्रांत
घट्ट बूच घालून, खोल-खोल,
सोडला आहे मुक्त श्वास: अखेर सारे संपले आहे!

आणि तरीही
अनिद्रच आहे हीही रात्र–
आपला तळ उठल्यावरही
हुलकावण्या देऊ पाहात आहेत
काळ्या सावल्यांचे गनिमी आभास
म्हणून नव्हे,
मी अजूनही अनिद्र आहे

असीम आनंदात
तपशील आठवीत ऐन तेव्हाचे
जेव्हा सरहद्दच हरपली होती
जगण्यामरण्यातली !

## कातर

आर्त पुरविसी, तरी
ऊर अजून कातर:
माझी चातकाची चोच,
झड तुझी धुवांधार !

## पानावरती

ऐन क्षणी पानावरती
ज्याच्यासाठी अडतो घास
त्याला कसे समजत नाही,
चोच तरी पाठवून द्यावी !
त्याला कसे उमगत नाही
नुसतीच चोच धाडणार नाही
अशी लागलीच शपथ घ्यावी !
त्याला अखेर कळले पाहिजे,
गहिवरलेला, दहिवरलेला
श्वासच संगे घेऊन जावा !

तुला, मला, यांना कळो :
घास दिल्या-घेतल्याविनाच
देता-घेता तृप्त व्हावा !

## शब्द शहाणे असतात

शब्द शहाणे असतात
ते थांबतात अचूक
जागच्या जागी
वाव देत–
घळघळणारी आसवं,
सावेग श्वासोच्छ्वास,
थरथरणारे ओठ,
खोल अवघ्राण,
कुरवाळत विचारणारे हात,
घट्ट मिठी
रंध्रारंध्राने सांगू पाहाणारी...
–वाव देत तिला, त्यांना,
साऱ्यानाही एकाच वेळी !

तरीही शब्दांना पुढे व्हावंच लागतं,
अर्धस्फुट, अनाकार, आदिम...
साधेल त्या रूपात,
ज्याला अर्थ असतो
जाड पुठ्ठ्यांच्या अनेक खंडांत
बंदिस्त न झालेला !

## रिक्त

माझ्या मनाच्या तळाशी
खोल एक असे खण
तुज दावायचे ते-ते
ठेवी अचूक वेचून.

भेट होता, पुढे करी
हर्षे गुपिते लाडिक,
दोष तुझाही मांडता
नाही तयाला दचक !

कधी मात्र काही केल्या
कळ नुघडीच ! –आणि
वळे तुझी पाठ, तोच
चढे त्याला वेडे पाणी :

उघडतो खाडकन
भिर्काविती जे-जे आत–
अखेरीस बसे रिक्त
स्वतःशीच धुमसत !

## केशरी

जीवघेणे इथे-तिथे
होते बसले रुतून,
सदा सावध डंखाया
ऐन आनंदाचा क्षण

उद्वेगाच्या कहरात
त्याची पेटविली होळी,
माझी अरुवार गूजे
त्याच्यासंगे आहाळली !

पोळलेल्या हाती माझ्या
आता घुंगूर-टिपरी
फेर धरितो रक्तात
धुंद फाल्गुन केशरी !

## निर्दय एकाग्रतेने–

निर्दय एकाग्रतेने अंतःकरण डागत
पुढेच सरकत असते
उन्मत्त ऊन, आक्रमक पवित्र्यात !
–अकस्मात् धुमाळत येते वादळ
खोल गाभ्यातून
भयभीत होतात गतीचे इशारे
निर्वाणीचेही,
ओथंबून येतात दिशा
दोन्ही क्षितिजांना भेदून जाते
एक लखलखती कळ आरपार
आणि दरवळू लागतात गंधित उमाळे
माझ्या रंध्रारंध्रातून ! –

पाऊस अजून कोसळायचाच असतो !

## ऐन माध्यान्ही

शोधू नको उणेदुणे
इथे-तिथे येता-जाता
त्या तो निःशंक सखये,
विनाशाच्या आडवाटा

नसलेले डंख नको
शब्दाशब्दावर ठोकू,
नको अहेतुकावर
शर संशयाचे रोखू !

निर्वाणीच्या क्षणी मात्र
कस निर्वाणीचा लाव
ऐन माध्यान्ही डोहाचा
पारखावा तळ-ठाव !

## जगावेगळचा

जगावेगळचा वाटेची वाकडी वळणं
एकदा आपली म्हटल्यावर
विसंबायचं असतं केवळ मनाच्या ऋजुपणावर
मी तुझ्या, तू माझ्या, आपापल्याही !
हे ऋजुपण सामर्थ्य देतं : शिणल्या देहासाठी
प्रसंगी काटेरी अंधार अंथरायचं,
चांदण्याची दुलई अंगावर ओढून घ्यायचंही !
जाग येते उजाडण्यापूर्वीच, तेव्हा किलबिलत असतात
अवती-भवती, पाखरं आपल्याच मनोगतांची,
एखादं तर उतरतंसुद्धा अलगद
तुझ्या मनगटावर, माझ्या खांद्यावर !
तुलाही हे सारं चांगलं कळतं, पण
नि:शंक पावलांनी तोडता आलं अंतर
कळण्या-पेलण्यातलं
तरच अखेर कृतार्थ व्हायचा आपला उषःकाल !

एरव्ही आहेच धोपट रस्ता सार्वजनिक सूर्याचा
तो तर वाटच पाहात असतो अशा परतत्या पावलांची !

## पुष्पहारासारखा

चालणे होतेच ओझे घेउनी तेढे मला
पुष्पहारासारखा मी भार माझा पेलला !

लक्षुनी ये मस्तका आघात जो वज्रापरी
घेउनी स्कंधावरी मी त्वेष त्याचा ठेचला !

कोंडले ते उस्मरोनी सांगते सांगोत ! –मी
मुग्ध गीतासारखा आक्रोश ओठी झेलला !

डंखिले ना सत्य केव्हा, स्नेह मी सन्मानिला,
वंद्य तेथे मात्र–माथा ना कुठेही वाकला !

–हे निळे आकाश ढाळी मुक्त सोनेरी उन्हे
रे, तुझ्यासाठीच–आता दे, गती दे पाउलां !

## साक्ष

उंचच उंच होत गेलेल्या
या चाऱ्ही भिताडांच्या वर असलेल्या
एकुलत्या गवाक्षातून
मला न का दिसेना
बाहेरचं अफाट जग,
संध्याकाळ झाल्याचं तर कळतं, रोजच
आणि गहिरी-गहिरीच होत जाते
केशरी किनार
माझ्या विश्वासाची !

प्रत्येक संध्येची एकच साक्ष
कुण्या वृक्षाच्या सुखरूप फांदीवर
पहिलं घरटं झुलू लागलं, तेव्हापासूनची :
इवल्या-इवल्या पाखरांनाही
अचूक गवसते आपली वाट
सीमातीत आकाशात !

## वडाची गोष्ट

वडाची गोष्टच वेगळी : त्याला पारंब्या फुटतात
अष्ट दिशांनी अधोमुख वाढत जाणाऱ्या,
धरणीला स्पर्शू पाहाणाऱ्या,
तिच्या पोटात शिरणाऱ्याही !

वड निर्चित वागवीत राहातो
फांद्या-डहाळयांवरची असंख्य घरटी,
त्यांतले अगणित संसार;
न्याहाळीत राहतो संथ कुतूहलाने
त्यांतली अविरत जीवन-मरणे
वर्षानुवर्ष !

त्याच्या अंगावरून जातात घनघोर वादळे
उत्पाताचा वसा घेऊन आलेली,
तेव्हाही त्याच्या पोटी नसते भय,
ओठी असते स्मित
समजलेपणाचे !

तो निःशंक उभा असतो, कृतार्थ –
विजेने खुशाल तुटून पडावे
कोणत्याही क्षणी !

वडाची गोष्टच वेगळी !

## मुक्त बोललो-बोललो !

मुक्त बोललो-बोललो
हास्य-विनोदही झाले
किती पुसू ?– सांगू किती ?
नाही भानच उरले !

आनंदाचा आवेग तो
झाला आपोआप शांत
आणि उन्मळून आली
खोल उरातली खंत

तुझ्या-माझ्यासाठीच जे
आत दाटून राहिले
दुःख सांगता-ऐकता
कढ अनावर आले !

आता सारे पूर सखे,
पार गेलेत वाहून –
रिता-भरला हा क्षण
जपू मौनात ठेवून !

## भान

मर्यादेच्या पार जाऊन, सारंच
केवळ असह्य होतं, तेव्हा
गर्जना करून उठतं, सर्वस्वाने,
माझं मन, नकळतच
एखाद्या ऊग्र श्वापदासारखं !

आणि भान येताच, पाठोपाठ,
खिळून राहातं जागच्या जागीच
श्वास आवरूनही
थरथरत राहाणाऱ्या
रानासारखं
पोटात हिंस्त्र भय शिरलेल्या !

## एखादा

नव्हते दूरत्व म्हणा –
घमघमला हर्ष न पण;
क्रम चालत नित्याचा
– एखादा उजळे क्षण !

रीतभात रास्तच, कशि
बसलेली सुबक घडी !
– एखादी सोनसळी
कधि अलगद हो उघडी !

ते, हे–किति विषय नवे
शब्दांचा ऐन बहर
– थेंब कुठे पापणीत,
एखादा स्वर कातर !

मीच मनाला पुसतो
येताना परत घरी :
हरलो मी काय ? किती
आलो जिंकून तरी ?

## भिंती

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

भिंतींनाही व्यक्तिमत्त्व असतं
चित्रांना तर असतंच असतं
मी सहेतुकच लावलं आहे या उजवीकडच्या भिंतीवर
एक हिरवंगार दृश्य जुईच्या ताटव्याचं
ज्यावर उतरला आहे पाखरांसारखा
आर्द्रा नक्षत्राएवढ्या शुभ्र फुलांचा भरगच्च थवा.
पूर्वेच्या जाळीतून येणारे कवडसे
जर्द पिवळे, गौर गुलाबी, केशरीसुद्धा ऋतुपरत्वे
त्याच्यावर बागडत असतात प्रत्येक सकाळी !
पावसाळ्यात कधी कवडसे पडत नाहीत,
तेव्हा भिंत म्लान होते. [आणि मीही ! ]

देवघराजवळच्या भिंतीवरचं तैलचित्र माझ्या आईचं !
वर्षं झाली, एका काळरात्री ती निघून गेली,
अकस्मात् !
सत्तरी उलटल्यावरही तेज:पुंज होती
मधुमासातल्या प्रात:कालासारखी;
प्रखर बाण्याची आणि उदंड मायेची.
भिंतीसमोरच्या खिडकीतून वृंदावन दिसतं.
तुळस अष्टांगी डवरते, कार्तिकाच्या मध्यावर, तेव्हा
आईच्या डोळ्यांतलं
निरांजनाच्या ज्योतीचं शीतळ तेज
अधिकच गहिरं होतं
भिंत कृतार्थ. [मीही! ]

घराला अर्थात् आणखीही भिंती आहेत.
माझी छायाचित्रं हातांत चाळवीत
मी कानोसा घेतला प्रत्येकीचा
काहींनी तात्काळ नकार दिला
— मी हे-ते लटकावलं आहे तिथे
जिच्या-तिच्या रुचीप्रमाणे —
दोघी-चौघी घोटाळत-घुटमळत मूक राहिल्या,
मूकच राहिल्या !
— प्रसंगी इतकं अवघड होतं स्वत:ला जोखणं ? —
अजूनही छायाचित्रं कपाटात,
भिंती सुन्या,
संभ्रांत. [मी सुद्धा !]

## मुक्त

होऊन आकाश
नित्य असतो सन्निधी,
मुक्त विहरावे तुवा –
तुज कळावे न कधी !

## फासे

मंतरलेल्या फाशांसारखे
अचूक
इच्छिलेले दान टाकणारे
तुझे पारंगत शब्द
व्यूह असा चतुर रचतात की,
ऐकणाऱ्याने केवळ भ्रमतच राहावे
चक्राकार
उलट-सुलट;
केंद्रस्थानीच्या सुरक्षित सत्यापर्यंत
त्याने कधी पोहोचूच नये !

आण घालून
तुला काही विचारायची
आता मुळी सोयच राहिलेली नाही !

## खोड

खरं म्हणजे माझ्या कवितेच्या शब्दाशब्दात
तिने मला शोधायला हवं, शोधायचंच झालं तर !
तिची खोडच वेगळी; ती ओळीओळीतून पुढे सरकते
दक्ष, स्वतःचा शोध घेत –

अभावित, दुवे जुळतातही : कुठे एखादा लाडका शब्द,
तिची रुसण्याची तऱ्हा, कुतूहलाने भुवया उंचावणं,
एवढ्या-तेवढ्यानेही पाझरणारे डोळे, निर्व्याज नजर...
–प्रत्येक वेळी ती मान वर करून माझ्याकडे पाहाते,
कधी तर स्वच्छ उमटतो तिच्या डोळ्यांत पारदर्शी अभिमान:
या कवितेत मीच आहे, सर्वत्र
थेट अखेरच्या उद्गार चिन्हापर्यंत !

तिचं मुग्ध सुख मला हिरावून घ्यायचं नसतं –
मी नुसता हसत राहतो, स्वतःशीच !

एखाद्या वेळी मात्र माझं हसू एकदम थबकतं,
दचकून मलाच विचारतं हलक्या आवाजात :
तिने तुलाच शोधत निघावं आणि तिला
स्वतःच्या पाऊल-खुणा गवसाव्या,
असं तर घडत नसेल ना ?

## चिरेबंदी

कडू-गोड दर्वळाचा
नक्षी-नाजूक मोहर
कधी कुठे उधळला
वाऱ्यावर चूर-चूर !

खुल्या, वत्सल वाड्याचे
जिणे झाले चिरेबंदी–
उमगले नाही, कशी
कोसळली फांदी-फांदी !

निंबोणीचे झाड माझे
आता दिसतच नाही,
चंद्र भागला तरीही
आड लपतच नाही !

केशवसुतास—

वाटणारा दुःखं वाटत निघाला, तऱ्हेतऱ्हेची—
कुणीच त्याच्या वाऱ्याला उभं राही ना !
त्याला आढळल्या झुंडीच्या झुंडी
पाठीला पाय लावून पळणाऱ्या
फटफटीत मुद्रेच्या.

कुचेष्टेच्या हसण्यात भीती दडवणारे काही
निसटण्याच्या जागा हेरून
शौर्याचं सोंग वठवीत
सावध स्थिरावले होते इथे-तिथे
तेवढाच काय तो लंगडा अपवाद !

उंचावरल्या एका आडवळणाशी तू दिसलास
एकटाच.

म्हणालास: 'प्राण पाखडूनही
सतीच्या अग्निदिव्याला सिद्ध असूनही,
पृथ्वीला सुरलोकसाम्य येणारच नसेल,
तर
सारं आयुष्य साकळून टाकणारं
जनमर्यादेच्या पलिकडल्या निराशेचं दुःख
मला हवं आहे,
असेल ना तुझ्याजवळ ?'

वाटणाऱ्याने तुला मिठी घातली
आणि तो स्फुंदू लागला
अनावर हर्षाने !

## पाने

पहिल्या पानावर श्रीकार
'श्री' वळणदार, पाहात राहावी अशी,
खाली स्वाक्षरी;

पुढल्या पानांवर फुलांचे घोस,
नाजूक पराग,
कुठे वेली, झाडे उंच-उंच होत जाणारी;

एका पानावर एकच पक्षी
पंख उभारलेला,
सबंध पान निरभ्र !

...पुढे-पुढे नुसती गिचमीड;

अधून-मधून पाने कोरीच
—असेही दिवस असतातच की,
झाडांवर पान उरू नये:
पाचोळाही रानोमाळ व्हावा ! –

या अखेरी-अखेरीच्या पानांवर तर
प्रश्नचिन्हेच
लहान, मोठी, वारंवार गिरवलेली,
नक्षीदार, कोरून काढलेलीसुद्धा ! ...

–तूच हाती दिलेली तुझी दैनंदिनी चाळताना
कळलेच नाही :
तू मला काही सांगत होतास
की, मीच स्वत:शी बोलत होते ?

## बोट

झुंबड हाटात–
सैरभैर दोन
पाऊले शोधती
        सुटलेला हात !

सुटल्या हाताला
रंध्रोरंध्री डोळे
व्याकुळ; तयाचे
        मेले एक बोट !

महालय ठाणे
काव्य २२।५।८०

## आज्ञा

वेगळी वाट धरणं अटळच झालं
तेव्हा,
आज्ञा सुटल्या लागोपाठ
वेताच्या फटकाऱ्यांसारख्या :

पावलांनो, चालत राहा सांगितल्या दिशेने,
डोळ्यांनी पाहात जावं नाकासमोर ! खबरदार
मानेचा कोन ढळला तर ! ओल्या केसांचा गंध,
ओठांना वारंवार लागलेली तहान, तत्पर रोमांच,
ऊष्ण स्पर्श . . . सारं-सारं इथेच राहू द्या !
लक्षात ठेवा कानांनो, मुळीच आतुर व्हायचं नाही
हरकत झेलायला हाकेतली –

आणि दक्ष मना, तू तडफडत राहा पिंजऱ्यात
आपल्याच आज्ञांच्या
रात्रंदिवस
जीवघेण्या विवंचनेत :
–इथे फट पडेल का पिंजऱ्याला ?
–तिथे तो मोडणार तर नाही ?

## उरी फुटताही

उरी फुटताही
मिटावेत ओठ
घट्ट, वस्तुपाठ
गिरवितो.

दडवावे पाणी
पापणीच्या कडां
कसे, उलगडा
झाला काही !

छटा वेदनेची
घासून एकेक
निर्विकार मुख
करो येते !

कोंदाटता आत
थडथडे भाता
तोही ठीक आता
थिरावू ये !

तरी कधी जातो
कवचाला तडा
सांधिता, एवढा
होई जीव !

उरी फुटताही—
तुझ्या ओठी हासू
दिसता ये आसू
डोळां माझ्या !

## गुढी

अर्धघडीचा दुरावा
जोपासावा दिसंदिस,
निग्रहाचे तप्त पाणी
नित्य चढवावे त्यास

व्रत कठोर! – होतेस
आत-बाहेर कोरडी
विजयाच्या वाटेवर
तुझ्या अबोलाची गुढी !

दृष्टीआड भोगतो मी
सांग-संपूर्ण सोहळा;
टाळ्या पिटतात हात,
थेंब सांभाळतो डोळा !

## अंधार कोरिला

अंधार कोरिला मी
-नव्हती गतीच काही!-
अन् हो उभे समोरी
सहसा पहाट-लेणे!

## आपल्या वाटांनी

मी तर सोडून दिला आहे एकेक अधिकार
आपण होऊनच
सहज, फूल-फूल ढाळत
प्राजक्ताने तळाशी ओघळू द्यावा
आपला बहर, तसा !

तुम्हां आता चालत राहायचे आहे
स्वच्छंद, आपल्या वाटांनी.
विचारलेच मागे वळून, तर सांगेनही;
पण पाहाणार नाही थांबून,
तुम्ही कोणत्या दिशेला वळत आहात;
हट्ट धरणार नाही : याच दिशेने जा,
इकडेच भ्रमत असतात, मंडलाकार,
शुभ्र शकुन-पक्षी लाल चोचींचे !

तुमच्या जखमांना माझ्याजवळ आसवे आहेत
आणि विजयाला टाळ्या,
खचलात तर हात आहे पाठीवर, उजवा.

तुम्ही चालत राहा
आपल्या वाटांनी.

## भैरवी : एक रागिणी

बंधनापलिकडच्या प्रियाचा ध्यास घेणारी
ही अनिर्बंध प्रणयिनी.
आपल्या उंबरठ्यावर तिने रेखून ठेवली होती
केवळ आत येणारी पदचिन्हं
आणि स्वागताचं स्वस्तिक, त्याच्यासाठी !

तिच्या आर्जवातला प्रत्येक शब्द पावलाखाली चिरडत
आता तो जाणारच असेल, उंबरठा ओलांडून, तर
या कोमलांगीने चिता रचलेली आहे अगरु-चंदनाची
स्वत:साठी, स्वत:च–
त्याने ती आपल्या हातांनी चेतवावी, जाण्यापूर्वी,
एवढीच तिची आळवणी !

काळजातलं अनाम दु:ख
समर्पणाच्या निस्सीम माधुर्यात उगाळत-उगाळत
अखेर माधुर्यच उरवणारी ही आळवणी आहे.
ती घेऊन जाते जमुनेच्या तीरापलीकडे
गर्द जांभळ्या रात्री, जिथे
दिवस उजाडून जातो, पण चंद्र उगवतच नाही,
आणि तरीही खंड नसतो जिथल्या कुलवंत प्रतीक्षेला
तृप्त करूनही हुरहुरत ठेवणाऱ्या !

## तिसरेच

एक धुंद कोसळावे,
एक उजळावे लख्ख
मला इतुकेच ठावे,
तुझे तिसरेच टोक !

ऊन पडे ना दिवसा
रात्री नक्षत्र हसे ना,
काळवंडला सदाचा
तुझ्या आभाळाचा ऐना!

अभ्रे हाकारिशी तूच,
तूच रचिशी घुंगट
घेशी ओढून, उरे ना
डोळ्यांपुरतीही फट !

दिस सरती – तू जणू
मुक्त – मुक्त कवचात,
माझी घुंगटाविनाही
घुसमट – घुसमट !

## आधीच

नेसू हिरवे – कुंतली
तुवा खोवता मरवा,
येई पावसाआधीच
माझ्या सृष्टीत गारवा !

## पेरले न काही

पेरले न काही
तरी बीज अंकुरले
घातले न पाणी
तरी आली दोन दले

निगराणीविना
रोप वाढतच गेले
वृक्षावर आज
लाख फूल उमलले !

वर्जिताही, धाव
घेती अधीर पाऊले
जाणिवेआधीच
चित्त गंधमत्त झाले !

—सोशीन मी ! कुणी
आता सांगू नका; "खुळे,
वेचता पाकळ्या
उद्या गळतील डोळे !"

## पाहतो मी –

पाहतो मी अंकुरात
तरू डवरला पूर्ण,
तुऱ्या-पात्यात गवती
उभा उत्फुल्ल श्रावण

कणसात इवलाल्या
सुगी समृध्द डुलते
आणि आताच कानात
शीळ तृप्तीची शिरते

स्वप्न भविष्याचे असे
माझ्या छंदात उमले
–कधी मात्र अवचित
घडे वाकडे, वेगळे :

वृक्ष प्रगल्भ पाहाता
आत सुन्न-सुन्न होई–
दिसे फांद्यांचे घर्षण,
दिशा पेटलेल्या दाही !

## जिवलग

नभ निळे फिकटसे,
पिसे उघळावी, तसे
शुभ्र तरंगती ढग

थवा गेला झेपावत
बघे कुणीशी चकित
ओठ अजून विलग !

एका कमानीचा पूल,
तळी सावळा ओहळ
विसरला लगबग

पेड, पान–सारी मुकी,
कळे-नकळे इतुकी
झुळुकेची अंगलग !

–प्रश्न काटेरी तसेच,
तरी उरते न बोच
होई जिवलग जग !

## खुणेच्या शब्दांचे अर्थ

नाटक तुला चांगलं साधतं
खुणेच्या शब्दांचे अर्थ
शब्दकोशात शोधत राहायचं !

मी नुसता उत्तरार्ध उच्चारला, तरी
जवंत व्हायचं सबंध वाक्य
तुझ्या अंतःकरणात
कानामात्रांसकट असंख्य संवेदनांच्या;
मोकळ्या जागा
माझ्या अबोलातल्या
तुला सहज भरता येत –तुलाही नकळत–
अपेक्षित संदर्भाची जी-ती छटा
जिथल्या तिथे
अचूक इतकी : जुईचं फूल
कधीच जाईचं होऊ नये !

अजून तू शब्दकोशातच गुंतलेली आहेस ना ?
अखेरचं पान उलटलं की,
पुनः पहिल्यापासून प्रारंभ कर हं !

## अर्धीच

उजवली वैशाखात　लेक दिवाळीला आली
आली अर्धीच माहेरी　अर्धी तिथेच राहिली !

शेजी एकाच शिणेच्या　खुणावती एकमेकां
असा भरता कानोला　थबकते मधेच का ?

'चार-चौघीत असून　कुठे हरवता बाई ?'
कोपराने धक्का देत　पुसतसे भावजयी

नको-नको म्हणताही　हात दळणाला लावी
साखरेचा गळा - पण　पुरी आठवेना ओवी !

आवडीचं थालीपीठ–　घास हातीच राहतो,
घोट घेता येता-जाता　कसा ठसका लागतो !

बाळपणीच्या सईशी　गूज अंगणी बोलता
शब्द तुटतो, दूरच्या　निहाळत राही वाटा...

कसं कळून कळेना　खुळचा, अधीऱ्या जीवाला ? :
आता पाडवा केवळ　दोन दिसांवर आला !

## पाखफुटे

वृक्ष कृतार्थ कोसळे
पक्षी झाले रानोमाळ,
पाखफुटे पिलू – त्याला
काय असून आभाळ !

## ते म्हणतात

ते म्हणतात : तुम्ही आता याच वळणावर थांबायचे आहे
तंबू ठोकून, नाहीतर झाडाखाली किंवा कसेही !
तसे ते प्रांजल आहेत : माझा खजिना ठेवून जाणार आहेत
माझ्यापाशीच. वाटले तर मी तो हाताळावा समाधानाने
वेचावा, जपावा किंवा कसेही !
माझा घोडाही ते ठेवून जाऊ म्हणतात : मनात येईल
तर करावी मी हलकी रपेट सकाळी, सायंकाळीही !
म्हणतात : आम्ही असेच निर्विघ्न निघतो नाकासमोर
वेळ होईपर्यंत आपापले तंबू ठोकण्याची. अडलोच तर
येऊही तुमच्याकडे गुंता उकलायला.
तुमच्या अनुभवी कर्तृत्वाला त्रिवार अभिवंदन !

मी म्हणतो : शुभास्ते पन्थानः सन्तु। उगाच मागे फिरू नका
मी येथे सापडणार नाही. कसे विसरलात की, मी तंबू ठोकतो
तो पहाटे कनात बाजूला सारून दूरच्या ताऱ्याला सांगावा
धाडण्यापुरताच—
अस्तमानी घोडा खुंटावतो तो प्रातःकाली त्याच्या खुरात
जलाल दौड भरावी म्हणूनच !
नमस्ते ! मित्रहो, नमस्कार !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२६०८
२६११८
काव्य २४।।।८०

## जखडलेले

चुकलेले निर्णय –त्यांना
विष असते जलाल,
पुष्कळदा
अहंकाराच्या वेष्टनात
बेमालूम दडलेले !

कळत नाही, पण
ते भिनत राहते अचूक
रंध्रारंध्रात;
उमगते तेव्हा सगळेच असते
खोलवर सडलेले !

आपले विश्व
पार उलटे-पालटे झालेले,
डोळे लख्ख उघडलेले
आणि आपण
अगतिक, जखडलेले !

## भेट

तेच केसांचे वळण
तीच कुंडलांची लीला–
हसू वरपांगी मात्र
गेले डंखून दृष्टीला

पाहिले –न पाहताही–
गेलो झपाटयाने पुढे
नाही वळली जराही
दृष्टी इकडे-तिकडे !

–आणि स्मरले : घडाया
भेट एक तरी क्षण
निवे, उकळे कितीदा
रक्त तेव्हा रात्रंदिन !

## सूर्यफळ

झेलत राहिलो कवडसेच तर,
सोनसळ्या भासांविना
    हाती काहीच लागत नाही,

लालबुंद सूर्यफळ
एकदा तरी चाखून पहावे
    ओढहि उरात जागत नाही !

## जाग

आहे परी दिसेना तो चंद्र पावसाळी
तरि पांडुर, क्षयी ही त्याची प्रभा नभात
नाही अरे खुळयांनो, अजुनी पहाट झाली
का मांडिली अकाली ही कावकाव येथे ?

नि:स्तब्धता सभोती; भयभीत, मूक वाटा
हलले न पान कोठे, सुटले न गार वारे
चिन्हे न ही कळावी ?– आश्चर्य यात नाही:
एकाक्ष जे तयांची इतुकीच रे, हुषारी !

चालेच ओरडा हा, चालोहि ! जातभाई
जमतील दूरचेही, होईल एवढेच !
सूर्यावरी उद्याच्या विश्वास गाढ ज्यांचा
वेळी अचूक त्यांना आतून जाग येते !

## सूर्य हा–

सूर्य हा तळपे येथे,
हा समक्ष जयद्रथ
प्रतिज्ञा-वीर पार्थाचे
हात दोन्ही लुळे-लुळे !

नि:शंक चालतो हात
सतीचे वस्त्र फेडिता,
कातडे ओढुनी घेई
डोळ्यांवर विकर्णही !

तो विराट सभेमध्ये
मत्त कीचक गर्जतो,
भीमकर्मा वळे लाडू
पाकशाळेत बल्लव !

वामकुक्षी यथाकाल
संपता, घेउनी चहा,
वृत्तपत्रात वाचावे
रोजचे लघुभारत !

## तांडा

एकांत पंथ माझा स्वच्छंद चालता मी
जमला सभोवताली तांडा कसा? कुठूनी?

मी मौन-गीत होतो चित्तात जागवीत–
कल्लोळ घोषणांचा झाला चहूकडूनी

बेभान फेकल्या त्या त्यांनी मुठी हवेत,
छातीवरी–असा मी– बांधून हात दोन्ही!

ते आपुल्या दिशेने मज चालवीत नेती
नकळे कुठे-कुठे हे काळे घुसेल पाणी!

राहू तयांत कैसा? जाऊ कसा सुटून?
'माझेपणा'स साक्षात् देतात हे भडाग्नी!

## अकलंकित

थोडासाही विश्वास असेल
माझ्या निशाणावर, तर
तटस्थ एकाग्रतेने
पुन्हा तपासून पाहा
गणित
—खास स्वत:च्या रीतीने सोडवलेले,
तुझ्या-माझ्या अनुबंधांचे—
निदान त्यातल्या उण्याच्या खुणा आणि
भागाकार शेष न उरवणारे !

गणितात
तुझे-माझे असे काहीच नसते,
एक निर्मम अचूकपण
हेच त्याचे व्रत !

तेवढे उजवलेस आणि
पोहोचलीसच अलिप्त उत्तरापर्यंत,
तर तुला जाणवेल की,
अजूनही अकलंकितच आहे
शुभ्रता
माझ्या निशाणाची !

## कवाड

ठोठावता आत स्पष्ट जागली चाहूल
खोल कुठे लगबग वाजले पाऊल

...जवळ...जवळ ! कसे मधेच अडले?
आड आले काय ? कोण अडसर झाले?

स्तब्ध-स्तब्ध सारे ! वाटे, कळे न कोठून
निहाळते कुणी दृष्टी सर्वांगी रोखून !

–नुघडे कवाड ! काळ गोठून उभाच
छातीत रुतली त्याची अवजड टाच !

कानी उत्कंठेचे सोन-काकण वाजत,
किंचाळून सांगे भय, 'समोर कल्पांत !'

ठोठवावे पुन्हा: हात नाही उचलत
परतावे: मागे पार बुडालेली वाट !

## अनोखे

आली तशी गेली
   अवेळेची सर–
कुपीत उरले
   अनोखे अत्तर !

## जित्या जडावाचे लेणे

थोरामोठ्याच्या घरचे
जित्या जडावाचे लेणे
निहाळिता रूप-रेखा
मी तो धुंद-धुंद होणे !

हात लावितो हळूच,
मनी जागे धाक, भय :
कुठे नुमगता दुवा,
ओळ दुखावेल काय ?

दृष्टी चकता लेणेच
करी वारंवार खूण–
कळ स्पर्शिताच कसे
उच्छ्वासते उमलून !

मुग्ध, आंतर लावण्य
उरी झरता-मुरता
थोर धन्याचा चहाळ
वाटे आला ओझरता !

सुख सुखापारचे हे
कसे एकट्याने लुटू ?
या रे, या रे, अवघे जन
येथे निरसले मी-तू !

## संदर्भ

भंगलेला पार, जख्ख टेकलेला वड
बाजूलाच वळणाची वाट अवघड

आटलेली नदी, कुठे साठलेले जळ
त्यात बिंबलेले फिके, विरक्त आभाळ

शिळा कोसळल्या इथे-तिथे अस्ताव्यस्त
दूरपर्यंत किनारा परका, संन्यस्त

खंत रित्या आयुष्याची यावी साकळून
तशी स्तब्धता सर्वत्र दाटलेली खिन्न

—तोच भरारला चार पोपटांचा थवा
आणि शून्यातही स्फुरे संदर्भ हिरवा !

## असाच केव्हा येऊन जा !

असाच केव्हा येऊन जा !
तळ नुसता ढवळू नकोस,
स्थिरावलेल्या पृष्ठावरती
बिम्ब शीतळ ठेवून जा !

असाच केव्हा येऊन जा !
देठ नुसता मोडू नकोस,
वेल माझी निगराणीची
फूल संगे घेऊन जा !

असाच केव्हा येऊन जा !

## सत्त्व

कान डंखती तुताऱ्या,
ऊग्र घुमती नगारे,
उभे-आडवे धावती
पुंड, पिसाळले वारे ;

लाख हत्तींच्या सोंडांनी
धुंद कोसळे आभाळ,
कसेबसे उभे माझे
घर बांधील का बळ ?

पार केला पाणकळा
जीव धरून मुठीत –
ऐन अखेरीस आता
सत्त्व पाहातो का हस्त ?

## नभ निळेभोर

नभ निळेभोर—नभ शुद्ध निळेभोर
संवेदन नाही दुजे समीप-समोर

पाझरते संथ-संथ आत निळी कीळ
ऊर स्वस्थ, शांत, तरी होई उतावीळ !

अथांगाचा अश्वत्थ हा उभा निळा-निळा
प्रौढ, पक्व—आणि किती कोवळा-कोवळा !

हवेपणापैलचे ये काहीबाही हाती
डोळियांनो, सुखभारे मिटू नका पाती !

मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणे

## काव्यनिर्मितीचा कालनिर्देश

| | | |
|---|---|---|
| १ | कळ | ८-७-७५ |
| २ | जन्मजात हर्षाची – | १०-४-७६ |
| ३ | अरून-फिरून | २८-३-८२ |
| ४ | शब्द | २९-७-७६ |
| ५ | ऋचा | ६-१०-७९ |
| ६ | थोडे तुझे – | ३०-७-७६ |
| ७ | गाथा संपलेली नाही | २७-७-७६ |
| ८ | गंध कळीत – | ११-८-७७ |
| ९ | क्षणभर स्तब्ध – | २७-७-७७ |
| १० | तळ | १५-८-७६ |
| ११ | समांतर | ११-८-७७ |
| १२ | यातायात | १०-७-८० |
| १३ | पंखपल्लवी | २२-८-८३ |
| १४ | आभाळी दिसे न | १३-९-७८ |
| १५ | घन आनंदाचा | १९-७-७७ |
| १६ | क्षणी एका | २४-७-८० |
| १७ | आश्वासन | २-८-८३ |
| १८ | उत्तररात्रीच्या – | १२-८-८१ |
| १९ | पाठीवरी उन्हाचे – | २३-७-८० |
| २० | येता सरीवर सरी | १७-२-७५ |

| | | |
|---|---|---|
| २१ | काहीच न घडल्यासारखी | ५-८-८३ |
| २२ | जेव्हा जलब्रह्म – | २०-८-७९ |
| २३ | सवलत | ९-५-७८ |
| २४ | अर्थ | १९-८-८१ |
| २५ | तू ओथंबून | ९-८-८३ |
| २६ | माझ्यासंबंधीच | ५-११-८१ |
| २७ | उमज | ३०-७-८४ |
| २८ | घोळवावा ओठांआड | २५-७-८१ |
| २९ | वाट बुजलेली | ३०-९-८१ |
| ३० | अनिद्र | १९-९-८१ |
| ३१ | कातर | २६-५-८७ |
| ३२ | पानावरती | २६-८-८१ |
| ३३ | शब्द शहाणे असतात | ७-१०-८४ |
| ३४ | रिक्त | ७-८-८२ |
| ३५ | केशरी | ६-८-८२ |
| ३६ | निर्दय एकाग्रतेने | २४-९-७८ |
| ३७ | ऐन माध्यान्ही | १६-८-८६ |
| ३८ | जगावेगळचा | १९-८-८३ |
| ३९ | पुष्पहारासारखा | १५-८-८३ |
| ४० | साक्ष | ५-९-८३ |
| ४१ | वडाची गोष्ट | २०-७-८४ |
| ४२ | मुक्त बोललो-बोललो! | २९-७-८२ |
| ४३ | भान | २४-११-८३ |
| ४४ | एखादा | ४-७-८५ |
| ४५ | भिंती | १६-९-८३ |
| ४६ | मुक्त | २३-९-८१ |
| ४७ | फासे | ७-११-८४ |
| ४८ | खोड | १४-९-८३ |
| ४९ | चिरेबंदी | २२-७-८४ |
| ५० | केशवसुतास – | २४-९-८४ |
| ५१ | पाने | २२-१०-८६ |
| ५२ | बोट | ६-९-८५ |

| | | |
|---|---|---|
| ५३ | आज्ञा | २६–९–८६ |
| ५४ | उरो फुटताही | २८–८–८६ |
| ५५ | गुढी | ४–९–८५ |
| ५६ | अंधार कोरिला | १९७९ |
| ५७ | आपल्या वाटांनी | ५–८–८४ |
| ५८ | भैरवी : एक रागिणी | १९–९–८३ |
| ५९ | तिसरेच | ३१–१२–८६ |
| ६० | आधीच | २९–१–८७ |
| ६१ | पेरले न काही | २३–५–८७ |
| ६२ | पाहतो मी – | १९–८–८७ |
| ६३ | जिवलग | १६–७–८७ |
| ६४ | खुणेच्या शब्दांचे अर्थ | १२–२–८५ |
| ६५ | अर्धीच | २३–९–८३ |
| ६६ | पाखफुटे | २९–९–८० |
| ६७ | ते म्हणतात | २२–११–७७ |
| ६८ | जखडलेले | ८–५–८६ |
| ६९ | भेट | ११–८–७९ |
| ७० | सूर्यफळ | १०–८–८५ |
| ७१ | जाग | १९–८–८२ |
| ७२ | सूर्य हा– | २–८–८६ |
| ७३ | तांडा | ३०–७–८७ |
| ७४ | अकलंकित | ९–५–८७ |
| ७५ | कवाड | १७–८–८५ |
| ७६ | अनोखे | १–१०–८५ |
| ७७ | जित्या जडावाचे लेणे | ७–८–८१ |
| ७८ | संदर्भ | १५–७–८२ |
| ७९ | असाच केव्हा येऊन जा | ३–३–७७ |
| ८० | सत्त्व | २०–९–८७ |
| ८१ | नभ निळेभोर | २३–७–८० |